# विमाविषयक संपूर्ण समुपदेशनाचे 'मायइन्श्युरन्सक्लब डॉट कॉम' दालन

**व्यापार प्रतिनिधी**

भारतातील विविध विमा कंपन्यांनी आणलेल्या वेगवेगळ्या योजनांची वैशिष्ट्ये आणि त्यांच्या किमतींचा निरपेक्षपणे तौलनिक वेध घेत, विमाविषयक संपूर्ण समुपदेशन करणारे ऑनलाइन दालन 'मायइन्श्युरन्सक्लब डॉट कॉम' या नावाने सुरू झाले आहे. यात आयुर्विमा, आरोग्यविमा, वाहन तसेच प्रवास विम्याचा समावेश आहे. आय गियर फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. या कंपनीने या ऑनलाइन सुविधेची सुरुवात केली आहे. अत्यंत हाय टेक आणि तर्कशुद्ध मॉडेल अवलंबिण्यात आल्याने मायइन्श्युरन्सक्लब डॉट कॉमवर ग्राहकांना तटस्थपणे पण उपयुक्त माहिती मिळविता येईल, असा दावा आय गियर फायनान्शियलचे सीईओ दीपक योहानन यांनी केला. यातून तज्ज्ञ व्यक्तींकडून सामान्य ग्राहकांना विमाविषयक सल्ला मिळविता येईल. शिवाय वेगवेगळ्या विमा एजंटांनाही स्वप्रशिक्षणाबरोबरच, त्यांच्या व्यवसायाविषयक माहिती देणारे एक व्यासपीठ म्हणून या सुविधेचा वापर करता येईल, असे योहानन यांनी स्पष्ट केले. ■